CMYK

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ३५१ ▪ रविवार, दि. ०३ मे,, २०२६ ▪ पोस्टल दिनांक ०४ मे, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-351 ▪ Sunday 03 May, 2026 ▪ Postal Date 04 May, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

सायं.दैनिक www.beedkisan.in

बीड किसान

• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

बीड जिल्हा    Epaper : www.beedkisan.in




# प्रशासनाचा दावा फोल; तिसऱ्या दिवशी ही पेट्रोल पंपावर रांगा कायम

## ट्रॅक्टरला डिझेल मिळत नसल्याने शेती कामे ठप्प; शेतकरी कॅन घेऊन पहाटेपासून रांगेत उभे

**बीड । किसान न्युज**

**मागील तीन दिवसांपासून बीड जिल्ह्यातील अनेक भागात पेट्रोल, डिझेलचा तुटवडा निर्माण झाला असल्याने पेट्रोल पंपावर रांगा लागल्या आहेत. मात्र प्रशासनाने शनिवारी रात्री इंधनाचे टँकर पोहोचले असून आज ही परिस्थिती दिसणार नाही असा दावा केला होता. मात्र हा दावा फोल ठरताना दिसत असून आज ही तिसऱ्या दिवशी पेट्रोल पंपावरील रांगा कायम दिसत आहे. तसेच सध्या शेतीची कामे सुरू असून ट्रॅक्टरला डिझेल मिळत नसल्याने कामांचा खोळंबा झाला आहे. यामुळे शेतकरी ही कॅन घेऊन पहाटेपासून रांगेत उभे आहेत. यामुळे सर्वत्र असंतोष पसरला आहे.**

### जिल्ह्यात इंधन उपलब्ध असलेल्या पंपाची यादी जाहीर

शनिवारी जिल्हा प्रशासनाने याबाबत इंधन कंपन्यांना फोनाफोनी करुन टँकर भरण्यासाठी सूचना केल्या आणि जिल्ह्यातील विविध पेट्रोल पंपावर इंधन पोहोचत असल्याचे सांगितले आहे. मात्र बीड शहराचा विचार केला तर येथे १० पेक्षा जास्त पेट्रोल पंप आहेत. पण यातील केवळ दोन पंपावर इंधन उपलब्ध झाल्याचे त्या यादीवरून दिसून येत आहे. यामुळे १० पेक्षा जास्त अकडा अन् दोन पंपावर इंधन पोहोचत असेल तर रांगा हटणार कशा? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



अखाती युद्धामुळे देशात इंधन टंचाई निर्माण झाली असून, आतापर्यंत याची झळ जास्त बसली नाही. असे काही चित्र नसून इंधन टंचाई निर्माण होणार नाही असा दावा केला जात होता. मात्र प्रत्यक्षात पाहिले असता मागील तीन दिवसांपासून बीड जिल्ह्यातील अनेक पेट्रोलपंपावर इंधन मिळत नसून नो स्टॉक चे बोर्ड लागले आहेत. यामुळे बऱ्याच ठिकाणी इंधन भरण्यासाठी प्रवासी, मालवाहू खाजगी, दुचाकी या वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. जिथे इंधन उपलब्ध आहे तिथे तब्बल एक ते दीड किमी पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. यामुळे वाहन धारक भर उन्हात उभे राहून हैराण झाले आहेत. यामुळे सर्वत्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. तर रात्री १२ आणि १ वाजेपर्यंत रांगा हटत नसल्याने पेट्रोल भरणारे कर्मचारीही परेशान दिसत आहेत. तसेच सध्या मे महिना सुरू असून जून च्या आधी शेतीची » पान २ वर




### मोठ्या प्रमाणात इंधनाची साठवणूक; अपघाताला निमंत्रण

इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर वाहनांच्या रांगा तसेच गरज नसताना नंतर इंधनाची अडचण निर्माण होऊ नये म्हणून काहीजण पेट्रोल, डिझेल ची साठवणूक करीत आहेत. एकीकडे आग ओकणारा सुर्य यामुळे निर्माण झालेली उष्णता आणि त्यात घरात इंधनाची साठवणूक हे एकप्रकारे अपघाताला निमंत्रण मानले जात असून जर यामुळे काही अनुचित प्रकार घडला तर जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यामुळे नागरिकांनी जागरुक होऊन अशा प्रकारे अपघाताला निमंत्रण देऊ नये अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अकरावी प्रवेशाच्या आता पाच फेऱ्या; विद्यार्थ्यांना दिलासा

**पुणे । किसान न्युज**

महाविद्यालयीन शिक्षणाची पहिली पायरी असलेल्या इयत्ता अकरावीची राज्य भरातील प्रवेश प्रक्रिया शासनाने गेल्यावर्षी ऑनलाइन केली. त्यामध्ये यावर्षी काही सुधारणा, बदल केले आहेत. यंदा प्रवेशाच्या एकूण पाच फेऱ्या होणार असून दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचा प्राधान्यक्रम भरता येणार आहे.




गेल्या वर्षी केंद्रीय पद्धतीने राबविण्यात आलेल्या प्रक्रियेत प्रवेशाच्या सतरा फेऱ्या झाल्या होत्या. अगदी डिसेंबरपर्यंत प्रवेश प्रक्रिया चालू राहिली. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अपुरा कालावधी मिळाला. त्याची दखल घेऊन शासनाने यावर्षी प्रवेश प्रक्रियेत सुधारणा केल्या आहेत. त्यानुसार राज्य मंडळ संलग्नित उच्च माध्यमिक कला, वाणिज्य, विज्ञान शाखांचे अकरावीचे प्रवेश केंद्रीय पद्धतीने गुणवत्तेच्या आधारे आणि ऑनलाइन प्रणालीद्वारे होणार आहेत. एचएसव्हीसी व्यावसायिकचे प्रवेश ऑफलाइन पद्धतीने शाळा स्तरावर होतील. सर्वसाधारण तीन फेऱ्या गुणवत्तेनुसार होणार आहेत. त्यात सामाजिक, समांतर आरक्षण लागू असेल. यानियमित तीन फेऱ्यांनंतर ओपन टू ऑल विशेष फेरी होईल. त्यात ऑनलाइन पद्धतीने रिक्त जागा दाखविण्यात येतील. उर्वरित रिक्त जागांसाठी दोन दिवसांचा कालावधी देऊन विद्याशाखा निवडण्याची विद्यार्थ्यांना संधी मिळणार आहे. ओपन टू ऑल या फेरीनंतर मुलींसाठी एक विशेष पाचवी फेरी घेण्यात येईल.

# सेल्फीचा नाद जीवावर बेतला; २ दिवसांत ६ जणांचा बुडून मृत्यू

**पिंपरी/लोणावळा । किसान न्युज**

मावळ तालुक्यात दोन दिवसांत सहा जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या दुर्घटना तीन वेगवेगळ्या ठिकाणी घडल्या असून, कामगार दिनी तीन कामगारांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. जाधववाडी येथे सेल्फी काढण्याच्या नादात तिघे मित्र बुडाले. अजय गारुडे, अनिकेत पवार आणि संतोष येडके (तिघेही रा. भोसरी) अशी त्यांची नावे आहेत. वलवण धरणात योगेश पालवे (वय ३०, रा. कुरवंडे, लोणावळा), यश कुलदीप धनोरिया (वय १३, रा. लोणावळा) यांचा मृत्यू झाला. मनोज भारत गौतम (वय २५, मूळ रा. उत्तर प्रदेश) असे पवन मावळातील साळुंब्रे गावच्या हद्दीत पवना नदी पात्रात बुडून मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.




# ऊसतोड मजुराच्या कुटुंबाला पंकजा मुंडे यांच्या हस्ते १० लाखांची मदत सुपूर्द

**गेवराई । किसान न्युज**

शहरातील म्हाडा कॉलनी येथील ऊसतोड मजूर धर्मा कांबळे यांचा दोन महिन्यांपूर्वी कर्नाटक राज्यातील सदाशिव साखर कारखान्यात ड्रायव्हर म्हणून काम करत असताना विहिरीत संशयास्पद मृत्यू झाला होता. मात्र दोन महिने उलटूनही कारखान्याने कुटुंबाला कुठलीही आर्थिक मदत दिली नव्हती.

ही बाब स्व. गोपीनाथरावजी मुंडे ऊसतोड मजूर संघटनेचे अध्यक्ष कृष्णा तीडके यांना समजताच त्यांनी तातडीने लक्ष घातले. डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेना बीड जिल्हा अध्यक्ष प्रकाश धुताडमल यांना सोबत घेऊन त्यांनी कारखान्याशी सतत संपर्क साधला. परंतु कारखाना प्रशासन टाळाटाळ करत होते. मात्र कारखान्याचे अधिकारी सत्यवान हे माजलगाव येथे आल्याचे समजताच कृष्णा तीडके यांनी आक्रमक भूमिका घेत प्रकाश धुताडमल यांच्यासह माजलगाव गाठले.



अधिकाऱ्याला ताब्यात घेऊन रात्री १२ वाजेपर्यंत मयत धर्मा कांबळे यांच्या घरी बसवून ठेवले. जोपर्यंत १० लाखांची मदत देत नाही, तोपर्यंत सोडणार नाही अशी ठाम भूमिका घेतल्यावर शेवटी कारखाना प्रशासनाला झुकावे लागले आणि १० लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. हा १० लाखांचा धनादेश काल राज्याच्या पशुसंवर्धन तथा पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते मयत धर्मा कांबळे यांच्या पत्नीला सुपूर्द करण्यात आला.



**बीड – मिल्लत उर्दू सेमी इंग्लिश प्री प्राइमरी स्कूल बीड शाळेत एलकेजी क्लास मध्ये ९८.% गुण घेऊन शाळेत अदीब फिरोज मनियार पाहिला क्रमांक मिळवल्या बद्दल तीचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.**

# गेवराई मतदारसंघातील विविध रस्त्यासाठी २५ कोटी मंजूर

## आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नांना यश

**बीड । किसान न्युज**

गेवराई तालुक्यातील विविध रस्त्यांच्या विकासासाठी तब्बल २५ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाले आहे. यामुळे जनतेमधून समाधान व्यक्त करीत आ. पंडित यांचे आभार मानले जात आहेत. मतदारसंघाचा विकास हाच ध्यास घेऊन गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आ. विजयसिंह पंडित यांचे काम सुरू आहे. त्यांनी आमदार झाल्यापासून मतदारसंघात कोट्यावधींचा विकास निधी खेचून आणला असून, यामुळे मतदारसंघात विकासकामे सुरू आहेत. माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी सातत्याने पाठपुरावा करी गेवराई तालुक्यातील उमापूर ते खळेगांव रस्ता रुंदीकरणासह सुधारणा करणे (७.३० कि.मी.) ७ कोटी, जातेगांव फाटा ते वाहेगांव रस्ता रुंदीकरणासह सुधारणा करणे (६.४० कि.मी.) ११ कोटी, भेंडटाकळी जोड रस्त्यावरील पुलाचे



बांधकाम करणे ३ कोटी, धानोरा जोड रस्त्यावरील पुलाचे बांधकाम करणे ४ कोटी असा एकूण २५ कोटींचा निधी मंजूर करुन घेतला आहे. यामुळे गेवराई विधानसभा मतदारसंघात रस्त्यांची सुधारणा होऊन » पान २ वर

# चार-दोन जनांमुळे सर्वांना दोषी का धरता

## मनोज जरांगे यांचे नेकनूर प्रकरणी सूचक वक्तव्य

**बीड । किसान न्युज**

मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे काल नेकनूर येथे बंकटस्वामी संस्थानच्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगतेसाठी आले होते. यावेळी त्यांनी येथील दगडफेक प्रकरणी भाष्य करताना ज्यांनी हा प्रकार केला त्यांच्यावर कारवाई व्हावी पण चार-दोन लोकांसाठी बाकीच्यांना दोष का देता? त्यांचा काय संबंध असे म्हणत सूचक वक्तव्य केले. नेकनूर येथे रिक्षाची दुचाकीला धडक लागल्याच्या कारणावरून दोन गटांत वाद झाला यावेळी महिलेला मारहाण केल्याचा आरोप करीत दगडफेक करण्यात आली. याप्रकरणी ३० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. १० आरोपींना अटक करण्यात आली इतर आरोपी मात्र फरार आहेत. काल शनिवारी (दि.२) मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे आले असता त्यांनी दगडफेक प्रकरणावर बोलताना त्यादिवशी नेकनूरमध्ये काहीतरी झालं होतं, त्यावेळी महाराजांना फोन करून विचारलं होतं, यायचं आहे का? कधीही हाक मारा सगळ्यात आधी आम्ही उभे आहोत, सगळे संकट आम्ही आमच्या अंगावर घ्यायला तयार आहोत. आमच्यावर केस झाल्याने काही फरक पडणार नाही, होऊ द्या जे व्हायचे ते, मात्र ज्यांनी हे केलं त्या चार दोन लोकांसाठीच बाकीच्यांचा काही दोष नाही, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी नेकनूरमधून दोन गटात झालेल्या राड्यानंतर सूचक वक्तव्य केले आहे.



स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड

9850643058

सोने २४ कॅरेट 151,500

२२ कॅरेट 144,000

चांदी प्रतिकिलो 245,000

# हाजी सय्यद झकरिया यांचे अल्पशा आजाराने निधन

**बीड । किसान न्युज**

शहरातील प्रसिद्ध व्यक्तीमत्व हाजी सय्यद झकरिया यांचे आज रविवारी (दि.३) पहाटे फजर च्या नमाज नंतर अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८१ वर्ष होते. मराठवाड्यातील प्रसिद्ध व सामाजिक व्यक्तिमत्व, तामीर-ए-मिल्लतचे विश्वस्त, निःस्वार्थ सामाजिक कार्यकर्ते हाजी सय्यद झकरिया मदनी रा. बीड यांचे आज पहाटे नमाज-ए-फजर नंतर अल्पशा आजाराने निधन झाले. यांची नमाज-ए-जनाजा आज असर नमाज नंतर तकिया मशिद परिसरात अदा केली जाईल आणि त्यानंतर शेजारील कब्रस्तानात दफनविधी करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात सात मुली, तीन मुले, जावायी, सूना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सय्यद झकरिया यांच्या निधनाने कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात सायं दैनिक किसान परिवार सहभागी आहे.



# अल्पवयीन मुलीचे अपहरण

**केज । किसान न्युज**

आई सोबत घरासमोर झोपलेल्या मुलीचे तिच्या आजोळच्या तरुणाने एका पांढऱ्या रंगाच्या कारमधून अज्ञात कारणासाठी अपहरण केल्याची घटना केज तालुक्यात घडली आहे. दि. २६ एप्रिल रोजी रात्री १२:०० वाजण्याच्या सुमारास केज तालुक्यातील एका गावातून अल्पवयीन मुलीचे वडील नातेवाईकांच्या लग्नाला बाहेरगावी गेले असताना, रात्री आई, आजी आणि भावा सोबत घरा समोर झोपलेल्या एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचे तिच्या आजोळी राहत असलेल्या एका तरुणाने पांढऱ्या रंगाच्या कार मधून तिचे अज्ञात कारणासाठी अपहरण केले. त्या अल्पवयीन मुलीला तिच्या आजोळचा तरुण मोबाईल वरून संपर्क साधत होता आणि ती त्याला आवडत असल्याचे म्हणत असे. ही माहिती अल्पवयीन मुलीने तिच्या आईला दिली होती. या प्रकरणी मुलीच्या आईच्या तक्रारी वरून अमोल मिनीनाथ गिराम याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. २५२/२०२६ भा. न्या. सं. १३७(२) प्रमाणे अल्पवयीन मुलीच्या अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपहरण करण्यात आलेल्या अल्पवयीन मुलीचे वय १७ वर्षे, ५ महिने, ११ दिवस आहे. तिचा रंग-गोरा, उंची अंदाजे ४ फुट ६ इंच, अंगात गुलाबी रंगाचा पंजाबी ड्रेस व गुलाबी रंगाची पॅन्ट आणि पांढऱ्या रंगाची ओढणी, पायात गुलाबी रंगाची सायंडल, केस काळे व लांब, ती मराठी भाषा मराठी बोलते. अशा वर्णनाची मुलगी कुणाला आढळून आल्यास किंवा तिची माहिती मिळाल्यास तपासी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश क्षीरसागर यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



CMYK